RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ५६

दि. १९ जून २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


## अनुसूचित जाती उपवर्गीकरणासाठी धर्माबाद ते मुंबई पदयात्रा लातूरात दाखल



**लातूर/प्रतिनिधी :** शोषणमुक्त समाज निर्मितीसाठी लोक स्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. रामचंद्र भरांडे यांच्या नेतृत्वात पावसाळी अधिवेशनावर दिनांक ११ जून २०२६ ते दिनांक ६ जुलै २०२६ पर्यंत धर्माबाद ते मुंबई पदयात्रा काढून महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती उपवर्गीकरण करून वंचित अनुसूचित जातींना न्याय देण्याबाबत सरकारचे लक्ष वेधण्यासाठी पदयात्रा काढण्यात आले असून ती लातूर येथे दिनांक १८ जून रोजी आली असता पत्रकार परिषदे घेऊन प्रा. डॉ. भरांडे यांनी माहिती दिली.

ते पुढे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाद्वारे राज्यांना अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा घटनात्मक अधिकार प्रदान केला आहे. या निर्णयामध्ये वास्तविक समानता,अंतरगत मागासलेपणा व अपुरे प्रतिनिधित्व या निकषांना विशेष महत्व देण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या एकसंध नसून त्या विविध स्तरांमध्ये विभागलेल्या आहेत. प्रत्यक्षात काही मोठ्या जातींना आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असून, मातंग व तत्सम जाती आजही सर्व क्षेत्रात मागे राहिलेल्या आहेत. त्यामुळे उपवर्गीकरण करणे ही काळाची गरज आहे.

भारतातील कर्नाटक या राज्यांने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केली आहे. विशेषतः हरियाणा राज्याने वंचितला आणि अल्प प्रतिनिधीत्व या निकषांवर आधारित दोन गटांची प्रभावी रचना केली आहे.

महाराष्ट्र शासनाकडून उपवर्गीकरण करताना लोकसंख्या किंवा जातवार महामंडळाचा आधार घेतला जात असल्याची माहिती समोर येत आहे. तथापी, असा आधार सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांशी विसंगत असून, तो घटनात्मक तत्वांना धरुन नाही. उपवर्गीकरणाचा उद्देश आरक्षणाचा लाभ खऱ्या अर्थाने वंचित घटकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. त्यानुषंगाने, महाराष्ट्रातील मातंग समाज पुढीलप्रमाणे उपवर्गीकरणाची योजना शासनास सादर करीत आहे. १. अनुसूचित जातींचे दोन गटात उपवर्गीकरण करण्यात यावे. अ) वंचित अनुसूचित जाती, ब) इतर अनुसूचित जाती २. आरक्षणाचे विभाजन पुढीलप्रमाणे करण्यात यावे :अनुसुचित जातींसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणापैकी ६ टक्के आरक्षण वंचित अनुसूचित जातींसाठी राखीव ठेवावे. उर्वरित ७ टक्के इतर अनुसूचित जातीसाठी ठेवण्यात यावे. ३. परस्पर संधी जर एका गटात पात्र उमेदवार उपलब्ध नसेल, तर दुसऱ्या गटातील उमेदवारास संधी देण्यात यावी. ४. सेवा भरतीतील अनुशेष १९६० पासुन वंचित अनुसूचित जातींच्या सेवा भरतीतील अनुशेष तातडीने व प्राधान्याने भरावे. ५. शैक्षणिक व आर्थिक संधी : शैक्षणिक प्रवेशात वंचित अनूसूचित जातीसाठी स्वतंत्र ६ टक्के आरक्षण लागु करावे. विविध शासकीय योजना व उद्योगांमध्ये किमान ६ टक्के संधी राखुन ठेवाव्यात. ६. अंमलबजावणीची कार्यपध्दती : उपवर्गीकरणानंतरची पहिली रिक्त जागा वंचित अनु. जातीसाठी देण्यात यावी. बिंदुनामावलीत कोणताही व्यत्यय येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अधिन राहून वंचित घटकांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र राज्यात तात्काळ अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण लागु करण्यात यावे. मुख्यमंत्री महोदयांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ती सकारात्मक कार्यवाही कराल अशी आम्हाला खात्री आहे अन्यथा होणाऱ्या परिणामास शासन जबाबदार राहील याची नोंद घ्यावी, असा इशाराही शेवटी या पत्रकार परिषदेत डॉ.प्रा.रामचंद्र भरांडे यांनी दिला आहे. यावेळी व्हि.जी. डोईवाड, नारायण कांबळे, संजय दोरवे, गोरख शिंदे,नागनाथ डोंगरे, पिराजी साठे,बालाजी शिंदे, भगवान वाघमारे आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## मतदान केंद्रावर व्हीलचेअर नसल्याने महिला नगरसेविकेचे हाल; उपस्थित नगरसेवकांनी उचलून नेत केले मतदान

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** औरंगाबाद–जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी मतदान सुरू असताना छत्रपती संभाजीनगर शहरातील मतदान केंद्रावर मतदारांसाठी मुलभूत सुविधांचा अभाव आढळला. आजारी असल्यानं चालता न येणाऱ्या नगरसेविकेला व्हीलचेअर न मिळाल्याने इतर नगरसेवकांना त्यांना उचलून मतदान केंद्रात आणावे लागले.

आजारी मतदारांची सोय का नाही हा जाब विचारल्याने चुकीच्या भाषेचा वापर करत अवमान केल्याचा आरोप भाजपाचे प्रवक्ते तसेच नगरसेवक प्रमोद राठोड यांनी केला. या प्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार असल्याचं यावेळी त्यांनी सांगितलं. औरंगाबाद – जालना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या मतदार प्रक्रिया पार पडत असताना पंचायत समिती इमारतीत हा प्रकार झाला. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातील ६३७ मतदार आज मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

आजारी नगरसेविकेला उचलून नेत मतदान – भाजपाच्या नगरसेविका सत्यभामा शिंदे या आजारी असताना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान केंद्रावर पोहोचल्या. त्यांना चालता येत नसल्यानं मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी व्हीलचेअरची मागणी करण्यात आली.

# विनोद खटके यांच्या वाढदिवसानिमित्त मिलिंद नगरच्या माता रमाई बुद्धविहारास बुद्धमूर्ती भेट; २० जून रोजी प्रतिष्ठापना सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** व्हीएस पँथर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक १ मधील मिलिंद नगर (गावभाग) येथील माता रमाई बौद्ध विहाराला भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती भेट देण्यात आली आहे. या बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना शनिवार, दि. २० जून रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली असून परिसरातील बौद्ध बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



माता रमाई बौद्ध विहारात होणाऱ्या या प्रतिष्ठापना सोहळ्यात भिखू पय्यानंद थेरो यांच्या शुभहस्ते बुद्धमूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. विनोद खटके यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवित बुद्धमूर्ती भेट दिल्याबद्दल बौद्ध समाजातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयश्री भालचंद्र सोनकांबळे राहणार आहेत. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून विनोद खटके, सचिन मस्के, देविदास काळे, मनोज थोरात तसेच रघुनाथ बनसोडे उपस्थित राहणार आहेत.

''चला बुद्ध विहाराकडे... धम्माच्या मार्गाकडे'' या संकल्पनेतून माता रमाई बौद्ध विहारात सातत्याने धम्मप्रसार आणि समाजजागृतीचे कार्य सुरू आहे. माता रमाई महिला मंडळाच्या वतीने प्रत्येक रविवारी महिला उपासिका पांढरे वस्त्र परिधान करून बुद्ध वंदना, त्रिशरण आणि पंचशील ग्रहण करतात. त्यामुळे परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले असून



सामाजिक ऐक्याला बळ मिळत आहे.



समस्त बौद्ध उपासक व उपासिका यांच्या वतीने आयोजित या प्रतिष्ठापना सोहळ्यास सर्व धम्मप्रेमी बांधव, उपासक-उपासिका व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. विनोद खटके यांच्या वाढदिवसानिमित्त मिळालेली ही बुद्धमूर्ती आणि तिची प्रतिष्ठापना हा मिलिंद नगरातील बौद्ध समाजासाठी प्रेरणादायी आणि स्मरणीय ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १९ जून, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ३ जुलै, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## लातूर जिल्हा वक्फ अधिकारी अर्सलान शेख यांची तात्काळ हकालपट्टी करा- मोहसीन खान

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात वक्फ मंडळाचा गलथान कारभार चालू असून येथील कार्यरत असलेले वक्फ जिल्हा अधिकारी अर्सलान शेखहे कधीच आपल्या कार्यालयात उपस्थित राहत नाहीत वक्फच्या कामाबाबतीत जिल्ह्यातील विविध तालुका,गाव येथील लोक मस्जिद नोंदणी,वक्फ मालमत्तेच्या कामांबाबतीत दिवस-दिवस या महाशयांची वाट पहात बसतात ज्यामुळे लोकांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागतो.




अर्सलान शेख हे कधीच आपल्या कार्यालयात नसतात फोन लावल्यास ते फोन उचलत नाहीत आपल्या सहकारी कर्मचाऱ्याशिवाय ते कोणाचाच फोन घेत नाहीत एखाद्या गंभीर प्रकरणा बाबतीत भेट घेऊन बोलावयाचा असल्यास ते कधीच समक्ष अथवा फोनवर उपस्थित रहात नसतात सहकाऱ्यांच्या फोनवर बोलून ते अरेरावीची भाषा करतात उद्धट वागतात तुम्हाला काय करायचे ते करून घ्या म्हणतात माझं कोणीच काही वाकड करू शकत नाही अशा शब्दात ते बोलतात आणि वागतात.



लातूर शहर हे सुसंस्कृत कर्मचारी लोकप्रतिनिधींचे शहर आहे या भागात ते आरोगंस पद्धतीने येणाऱ्या निवेदनाबाबतीत असेल अथवा काही कामाबाबतीत असेल अशांशी उद्धट वर्तन करतात,अशा खालच्या पातळीच्या ( छपरी )वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची लातूरला गरज नाही लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुका,मौजे गाव देवांग्रा या गावातील वक्फ मालमत्तेबाबतीत सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यासाठी मी गेलो असता ते नेहमीप्रमाणे उपस्थित नव्हते त्यांना वारंवार ७३८५२९०८८९ यावर कॉल केला असता त्यांनी फोन उचलला नाही,त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांना सांगितले असता त्यांनी फोन लावून दिला त्यावर त्यांनी अरेरावीची भाषा केली,अरवारच्या भाषा केली,माझं कोणीच काही करू शकत नाही,माझं काही कोणीच उपटून घेणार नाही,तुम्हाला कुठे जायचे तिथे जा माझं कोणीच काही वाकडं करू शकत नाही अशा बाबतीत वल्गना केली.

अर्सलान शेख सारख्या उद्धट कर्मचाऱ्याला तात्काळ हटविण्यात यावे जेणेकरून वक्फ मंडळाची बदनामी होऊ नये. अशा आशयाचे निवेदन (मागणी )वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काजी व कार्यकारी मुख्यधिकारी वक्फ बोर्ड यांना मेल द्वारे मोहसीन खान यांनी केली गेली आहे.या बाबतीत विचार न झाल्यास संबंधीत अधिकारी अर्सलान शेख याच्या विरोधात तीवृ आंदोलन करण्यात येईल असा इशाराही मोहसीन खान यांनी दिला आहे.

## २०२ ज्येष्ठांनी केली एनसीएमसी कार्डची नोंदणी



**लातूर/प्रतिनिधी :**एसटी महामंडळ व फेसकाम यांच्या संयुक्त विद्यमाने करार केल्यानुसार लातूर येथील ज्येष्ठ नागरिक संघ क्रीडा संकुल येथे एस.टी. साठी लागणारे एनसीएमसी कार्ड काढून घेण्यासाठी जेष्ठ नागरिकांसाठी दिनांक १५, १६ ,१७ /६/ २०२६ हे तीन दिवस सकाळ संध्याकाळ कम्प ठेवण्यात आला होता. या तीन दिवसात २०२ लोकांनी एनसीएमसी कार्ड ची नोंदणी केली या कामाकरता एस .टी. महामंडळाच्या एजन्सी कडून योगेश डांगे, अभिजीत गिरी, व वाघमारे हे नोंदणीसाठी आले होते.

ही नोंदणी ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यालय क्रीडा संकुल येथे करण्यात आली यास ज्येष्ठानी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला कॅम्प यशस्वी करण्याकरिता प्रकाश घादगिने, डॉक्टर काशिनाथराव सलगर, शहाजी घाडगे, रमेश भोयरेकर, प्रकाश निला,वसंत बेंडे आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रकाश घादगिने यांनी केले.

# महायुतीचे उदगीरात सामूहिक मतदान

## माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी मतदारांना दिल्या शुभेच्छा

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर : धाराशिव-बीड-लातुर या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या निवडणुकांसाठी गुरुवारी (दि.१८) रोजी उदगीर शहरातील बुथवर महायुतीच्या मतदारांनी सामूहिक मतदान केले. यावेळी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्यासह माहायुतीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मतदान केंद्रावर आगमन झाल्यानंतर नगराध्यक्ष स्वाती हुडे यांच्यासह सर्व मतदारांचे आमदार संजय बनसोडे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर सर्व मतदारांनी एकत्रितपणे मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. मतदान केंद्र परिसरात उत्साहपूर्ण वातावरण पाहायला





मिळाले.

या निवडणुकीत उदगीर बुथवर नगरपालिकेतील ४५ तर जिल्हा परिषदांच्या ८ मतदारांनी आपला हक्क बजावला. २५ महीला तर २८ पुरुषांनी मतदान केले.उदगीरमध्ये माहायुतीच्या वतीने मतदानासाठी नियोजनबद्ध तयारी करण्यात आली होती. सकाळपासूनच मतदारांची उपस्थिती दिसून आली. निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासनाने आवश्यक व्यवस्था केली होती.

आमदार संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत महायुतीच्या सर्व मतदारांनी वेळेत मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदविला. यावेळी जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, जिल्हा परिषदेचे गटनेते दिलीपकुमार मटके, नगरपालिकेचे गटनेते अनिल मुदाळे, भाजपाचे गटनेते मनोज पुदाले, आदी उपस्थित होते.

यावेळी माहायुतीतील विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते तसेच समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मतदानानंतर उपस्थितांनी विजयाचा विश्वास व्यक्त करत आगामी निकालाबाबत आशावाद व्यक्त केला.

## संपादकीय...

### भारताचे परावलंबन कमी होणे गरजेचे...

इराण-इस्रायल, अमेरिका संघर्ष शमल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली. भारतासारख्या तेल आयातदार देशासाठी ही अत्यंत दिलासादायक घडामोड आहे. इस्रायल-अमेरिका यांचे संयुक्तपणे इराणबरोबर सुरू असलेले युद्ध आता शांत होत असून त्याचा परिणाम तेलाच्या किमतीवर दिसत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तेलाची किंमत ८० डॉलर्स प्रतिबॅरलच्या खाली आली असून ही अत्यंत आनंदाची आणि देशाच्या एकूण प्रगतीला प्रोत्साहन ठरणारी बाब ठरते. तेलाच्या या प्रचंड चढ-उताराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर तितकाच मोठा परिणाम होतो, याचे कारण म्हणजे आपले तेल परावलंबन ८५ ते ९१ टक्के इतके मोठे आहे. साहजिकच, तेलाच्या किमती वाढल्या तर आपली सर्व आर्थिक गणिते राष्ट्रीय आणि वैयक्तिकस्तरावर बिघडतात. तेलाच्या किमती कमी झाल्यानंतर त्याचे निश्रि्चत फायदे संपूर्ण अर्थव्यवस्थेला, विविध क्षेत्रांना आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वसामान्य जनतेला दिलासादायक ठरतात, याचा थोडासा तपशील अभ्यासणे उपयुक्त ठरते. अर्थव्यवस्थेची गतिमानता ही सातत्याने ऊर्जापुरवठ्यावर अवलंबून असते. भारताचे तेल परावलंबन कमी होण्याऐवजी वाढले आहे, त्यातही पुन्हा तेलाच्या किमती प्रचंड प्रमाणात कमी-जास्त होत असल्याने त्याबाबत निश्रि्चत धोरण ठरवणे अडचणीचे होते. गेल्या दशकातील तेल किमतीचा विचार केला, तर तेलाची किंमत २०१६ मध्ये फक्त ३० डॉलर्स प्रतिबॅरल होती, ती २०१७-१९ या काळात ५० ते ७० डॉलर्स प्रतिबॅरल झाली. कोरोनाचा परिणाम म्हणून तेलाची मागणी प्रचंड प्रमाणात घटली आणि प्रतिबॅरल १८ ते २० डॉलर्स इतक्या नीचांकी पातळीवर तेल घसरले; पण नंतर कोरोना पश्र्चात तेलाच्या किमती २०२१-२२ मध्ये १२० डॉलर्स प्रतिबॅरलपर्यंत उंचावल्यानंतर २०२३-२४ मध्ये हीच किंमत प्रतिबॅरल ७० ते ९० डॉलर्स यादरम्यान आली. २०२५ च्या पूर्वार्धात ६०-७० डॉलर्स प्रतिबॅरल असणारी किंमत इराण-इस्रायल युद्धाच्या परिणामातून १०० डॉलर्सच्या पुढे ही किंमत गेली. संपूर्ण पुरवठा साखळी, अर्थव्यवस्था अडचणीत आली. होर्मुझ जलमार्गातून २० टक्क्यांपेक्षा अधिक जागतिक तेलाचा पुरवठा होत असल्याने संपूर्ण जगात तेलसंकट गंभीर बनले. आता शांतता करार होत असून भविष्यकाळात तेलाच्या किमती ८० डॉलर्सखाली स्थिरावल्या, तर भारत पुन्हा एकदा अत्यंत वेगाने विकास साध्य करू शकतो. तेलाच्या घसरणाऱ्या किमतीमुळे देशाच्या विविध क्षेत्रांवर होणारे सकारात्मक परिणाम महत्त्वाचे ठरतात. तेलाच्या वाढत्या आयातीमुळे आपल्या चालू खात्यावरील तूट मोठ्या प्रमाणात वाढते. यासाठी जर १० डॉलर्सने तेल वाढले, तर आपल्या चालू खात्यावरील तूट राष्ट्रीय उत्पन्नाच्या अर्धा टक्क्यापर्यंत म्हणजेच ९ ते २० बिलियन डॉलर्स इतक्या मोठ्या प्रमाणात वाढते. याउलट तेलाच्या किमती घसरल्याने आपल्या राष्ट्रीय उत्पन्नात अर्धा ते एक टक्का वाढ होते, ही वाढ निश्रि्चतच मोठी ठरते. युद्धाच्या काळात तेल निर्यातक राष्ट्रांची मोठी अडचण झाली होती. आता त्यांच्यातील स्पर्धा आपणास हितकारक ठरते. तेलाच्या किमती त्यामुळे नजीकच्या काळात ७५ डॉलर्सच्या आसपास येऊ शकतात. तेलाच्या वाढत्या किमतीमुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेत महागाईचे संकट वाढते. सुदैवाने तेल किमती कमी झाल्याने हे महागाईचे संकट आता दूर होईल. जेव्हा १० डॉलर्सने तेल महाग होते, तेव्हा महागाईचा दर हा अर्धा ते एक टक्का वाढतो. आता उलट परिणाम म्हणून महागाईच्या दरात ४ टक्क्यांपेक्षा कमी दरवाढ अपेक्षित ठेवता येईल. सरकारला दरवाढीच्या काळात गॅस आणि डिझेल, पेट्रोल यावर मोठ्या प्रमाणात दरवाढ करता येत नसल्याने त्यासाठी अनुदान द्यावे लागते. परिणामी, सरकारचे उत्पन्न विकासकामांऐवजी आता दर नियंत्रणासाठी द्यावे लागत होते, ही परिस्थिती बदलल्याने तेवढ्या प्रमाणातील रक्कम विकासकामांसाठी वळवणे शक्य होते. भारताचा विकास दर अडचणीच्या परिस्थितीतदेखील टिकून होता. सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था हे वैशिष्ट्य आता पुन्हा एकदा तेल किमती कमी झाल्याने टिकवता येते; कारण तेलाच्या किमतीत १० डॉलर्सने वाढ झाली, तर आपले राष्ट्रीय उत्पन्न घसरत होते. तेल दरवाढीच्या कालखंडात राष्ट्रीय उत्पन्न ७ टक्क्यांऐवजी ते ६ टक्क्यांपर्यंत घसरेल, असे अंदाज होते. आता राष्ट्रीय विकासाचा दर ८ टक्क्यांच्या पुढे जाऊ शकेल. यातून रोजगार वाढवून बेरोजगारीच्या प्रश्र्नही काही प्रमाणात सुटेल. भारतीय रुपया शतक पार होण्याची भीती तेल दरातील वाढीने निर्माण झाली होती. तथापि, आता आयातीचा भार कमी होऊन रुपयादेखील बळकट होईल. हळूहळू रुपया ९० च्या आत येऊ शकेल, याचसोबत आयात खर्च कमी झाल्याने देशांतर्गत उत्पादन कमी खर्चात होऊन कंपन्यांचा नफा वाढेल आणि विदेशी गंगाजळीदेखील वाढेल. देशाच्या आर्थिक आरोग्यात महत्त्वपूर्ण सुधारणा दिसेल. तेल किंमतवाढीचे चटके सर्वच क्षेत्रांत जाणवत असताना, तीव्र उन्हाळ्यात पावसाची सर यावी तसेच किंमत घसरणीचा अनुभव सर्व क्षेत्रांना मिळेल. वाहतूक उत्पादन क्षेत्र, वाहन उद्योग या सर्वांना तेल किंमतघटीचा अत्यंत सकारात्मक फायदा दिसतो. दीर्घकाळात भारतीय अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी राहण्यास याची मदत होईल. तेलाच्या किमतीतील घसरण ही कायमस्वरूपी बाब नसून तात्पुरती मिळालेली एक महत्त्वाची संधी मानावी लागेल. परावलंबन कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जास्रोतांचा शोध आणि वापर महत्त्वाचा ठरतो, याबाबतही आपण मोठी झेप घेत आहोत. सौरऊर्जेचा वापर करून घरगुती वीज वापर कमी करणे, हे सर्व प्रयोग भारत ऊर्जा स्वावलंबनाकडे नेण्याची महत्त्वाची पाऊलवाट ठरते. आपली स्पर्धात्मकता केवळ तेलाच्या किमतीने अडचणीत येते. तेल अत्यंत लहरी पद्धतीने आपले दर दाखवत असते. हा गेल्या दशकाचा अनुभव गाठीशी असल्याने तेल किमतीच्या घटीच्या महत्तम फायदा घेत असतानाच किमती पुन्हा वाढतील हा धोका लक्षात घेऊन नियोजन करणे शहाणपणाचे ठरते. तेलाच्या वाढत्या किमतीमुळे भारतीय उद्योजकांची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता कमी झाली. आता तेल घसरल्याने भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक वाढेल. विदेशी गुंतवणूकदार जे भारतातून भांडवल काढून घेत होते ते आता पुन्हा एकदा गुंतवण्यास सुरुवात करतील. शांतता करार ही बातमी येत असतानाच सेन्सेक्स दोन दिवसांत १,५०० अंकांनी वाढला. अर्थातच, भांडवल बाजार हा अनेक अर्थाने केवळ संवेदनशील नव्हे, तर भविष्यकालीन वाटचालीचे दर्शक असतो. त्यामुळे पुन्हा एकदा सेन्सेक्स हा लक्षपूर्तीकडे म्हणजेच एक लाख हा टप्पा वर्षाखेरीस पार करू शकेल, असा अंदाज तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. तेल किमती कमी झाल्याने होणारा फायदा हा सक्रियपणे पुढे हस्तांतरित करण्याची महत्त्वाची जबाबदारी सरकारची ठरते; अन्यथा तेलाच्या किमती फक्त वाढवणे व आंतरराष्ट्रीय तेल किमती घसरल्यानंतर त्या कमी न करणे हा पूर्वपाठ न ठेवता सर्व अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी हे एक महत्त्वाचे भांडवल म्हणून वापरणे आवश्यक ठरते. विदेशी गुंतवणूक सरकारच्या विविध धोरणांचा अत्यंत चिकित्सक विचार करत असल्याने अर्थव्यवस्थेची सक्षमता वाढवण्यासाठी धाडसपूर्ण दर कपात सर्व जनतेपर्यंत पोहोचवणे व सर्व क्षेत्रांपर्यंत त्याचे फायदे मिळवून दिले तरच सकारात्मक परिणाम दिसून येतील. सौरऊर्जेचा वापर करून घरगुती वीज वापर कमी करणे, हे सर्व प्रयोग भारत ऊर्जा स्वावलंबनाकडे नेण्याची महत्त्वाची पाऊलवाट ठरते. आपली स्पर्धात्मकता केवळ तेलाच्या किमतीने अडचणीत येते. तेल अत्यंत लहरी पद्धतीने आपले दर दाखवत असते. हा गेल्या दशकाचा अनुभव गाठीशी असल्याने तेल किमतीच्या घटीच्या महत्तम फायदा घेत असतानाच किमती पुन्हा वाढतील हा धोका लक्षात घेऊन नियोजन करणे शहाणपणाचे ठरते. तेलाच्या वाढत्या किमतीमुळे भारतीय उद्योजकांची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता कमी झाली. आता तेल घसरल्याने भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक वाढेल. विदेशी गुंतवणूकदार जे भारतातून भांडवल काढून घेत होते ते आता पुन्हा एकदा गुंतवण्यास सुरुवात करतील. शांतता करार ही बातमी येत असतानाच सेन्सेक्स दोन दिवसांत १,५०० अंकांनी वाढला. अर्थातच, भांडवल बाजार हा अनेक अर्थाने केवळ संवेदनशील नव्हे, तर भविष्यकालीन वाटचालीचे दर्शक असतो. त्यामुळे पुन्हा एकदा सेन्सेक्स हा लक्षपूर्तीकडे म्हणजेच एक लाख हा टप्पा वर्षाखेरीस पार करू शकेल, असा अंदाज तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

# देवानंद पवारांची कविता : माणसे जोडणारी

कवी देवानंद पवार यांचा सब्बे सत्था सुखी होन्तु ! हा दुसरा कवितासंग्रह प्रकाशित होतो आहे. या कविता संग्रहाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मी देवानंद पवारांचे अंतकरणापासून अभिनंदन करतो. त्यांचा काळोखाला भेदणारा सूर्य हा कवितासंग्रह २००९ या वर्षी प्रकाशित झाला. तो संग्रह महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केला होता. देवानंद पवार प्रकृतीने कवी आहेत आणि मुख्यत्व त्यांनी कविता लेखनच केले आहे. एक: देवानंद पवारांची घडण औरंगाबादेच्या नागसेनवनात झाली.


नागसेनवन म्हणजे आंबेडकरी चळवळीची रणभूमीच आहे. बाबासाहेबांच्या प्रेरणांनी हा परिसर सतत हेलावत असतो. या परिसरात रूजू होणारी मने ही चळवळीतच रूजू होत असतात. प्रत्येकच मनाची इथे नवरचना होत असते, मने दुथडी भरुन वाहायला लागतात. नव्या स्वप्नांसोबत बोलण्याच्या इच्छा या मनांमध्ये निर्माण होतात. हा जिवंत परिसर इथे येणाऱ्या मनांनाही जिवंत करतो. देवानंद पवार यांचे मानसिक निर्माण या परिसरात झालेले आहे. त्यांनी आता स्वतःचे बोधीपर्ण प्रकाशन सुरू केले असून हे त्यांचे प्रकाशनच त्यांचा सब्बे सत्था सुखी होन्तु हा कविता संग्रह प्रकाशित करीत आहे. कवी देवानंद पवार यांना मी या कविता संग्रहाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मनापासून सदिच्छा देतो.

दोन : देवानंद पवारांनी आपल्या वैचारिक आदर्शांना एका कवितेत वंदन केले आहे. ते त्यांच्या जीवननिष्ठेवर प्रकाश टाकलेच, पण सर्वसामान्य लोकासंबंधीची त्यांची आस्थाही प्रकट होते. ओवी या रचनाबंधातून ते आपणाला जाणवते. या कवितेतून बुद्ध, तुकोबा, जिजाऊ, छत्रपती शिवराय, जोतीराव फुले, सावित्री माई, छत्रपती शाहू, सयाजीराव गायकवाड, बाबासाहेब आंबेडकर, रमाई आणि अण्णाभाऊ साठे यांना त्यांनी वंदन केले आहे. या ओव्यांमधून कवीने लोकांच्या माणुसकीचा विकासमार्गच मांडलेला आहे.तीन : या कवितेच्या लेखनाचा उद्देश कवीने अनेक ठिकाणी मांडलेला आहे. त्यातली काही ठिकाणे अशी -

१. तरीही आम्ही करतो धडपड माणसासाठी माणसं जोडण्यासाठी.
२. सब्बे सत्था सुखी होन्तु ! म्हणत निर्माण व्हावी माणसं माणसाला जोपासण्यासाठी.
३. ठिणगीकडून वणव्याकडे जाणारी वाट म्हणजे तांडा.
४. चालत राहावं प्रकाशाच्या दिशेने काळोखाचे पडदे फाडत ...
५. स्वातंत्र्याचे गाणे गात अंधाराला कापत कापत भीम सैनिक निघेल हातात बंडाचे निशाण घेऊन !
६. मी त्यांना संविधान सांगतो समता, न्याय, स्वातंत्र्य सांगतो.
७. निळा, भगवा, हिरवा, पिवळा, लाल, यांना एकत्र करून गडद व्हायचंय माणसासाठी.

ही सर्व अवतरणे हे सांगतात की, कवीला सामाजिक सलोख्याची उत्कट तहान लागलेली आहे. ही गोष्ट मला विशेषच महत्त्वाची वाटते. या ध्येयाकडे जाण्यासाठी कवीने आपल्यापुढे बुद्धाच्या प्रज्ञानाचा उजेड अंथरलेला आहे. त्याला माणसांच्या उद्धारासाठी बंधुभाव - भगिनीभाव हवा. कवी विचारमंथन नाकारीत नाही, पण आता विचारसंस्कृतीला कृतीसंस्कृतीची जोड द्यायला हवी, असे कवीला प्रकर्षाने वाटते.

''आता खूप झालं विचाराचं मंथन करून आता व्यवस्थेच्या या सिरिअल किलरला मला दीक्षा द्यायची आहे माणसाची जगात शांतता नांदावी म्हणून आम्हाला युद्ध नको बुद्ध हवा.फक्त माणसासाठी ! फक्त माणसासाठी'' बुद्धाने मानवी जीवनाचा एकमेव नायक माणूसच आहे, हे सांगितले. बुद्धिमत्ता हीच माणसाची सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे. या बुद्धीनं निरर्थकांमध्ये भराऱ्या घेण्यापेक्षा फक्त माणसाची महत्ता वा माणसाचे महानायकपण मांडावे. मानवी बुद्धिमत्तेचा याहून दुसरा मोठा सन्मान कोणालाही करता येत नाही. हीच गोष्ट बाबासाहेबही सांगतात. आणि बुद्ध वा बाबासाहेब यांनी मानवी जीवनासाठी युद्धविहीनता हेच ध्येय परम मानले. हिंसेच्या मार्गाने माणसे मारता येतात. माणसे ही आणि माणुसकीची





हिंसेच्या मार्गाने जगवता येत नाहीत. जीवनाला उजेडगामी करणारा हाच शहाणा (विस्डममय) सिद्धान्त आहे आणि त्याचा उच्चार कवीने प्राथम्याने या कवितासंग्रहात केला आहे. चार : कवीच्यापुढे युद्ध आहे ते स्वाभिमानाचे ! सेल्फ रिस्पेक्टचे ! आजची धर्मांधता आणि धर्मनिरपेक्षता यातील तीव्र संघर्ष कवी मांडतो. बेरोजगारीसारखे तरुणांचे प्रश्न, झुंडशाही, शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्रियांवरील अत्याचारांचे प्रश्न असे सर्व प्रश्न सुटावेत, असे कवीला वाटते आणि त्यासाठीच कवी म्हणतो- म्हणून आम्ही होतो मार्गस्थ, शिव-भीम मार्गाने आणि याप्रकारे शिवाजी राजे आणि बाबासाहेब यांच्या सर्वसन्मानदायी भूमिकांचा एकमय ध्वज खांद्यावर घेतो. छत्रपती शिवाजी राजांनी जाती-धर्मांवरुन माणसांमध्ये भेद केला नाही. त्यांनी माणसाच्या सभ्यतेवरुन माणसाचे मूल्य ठरवले. बाबासाहेबांनी तर एकव्यक्ती एकमूल्य सांगितले. सर्व भारतीय समान आहेत. जाती, धर्म, पंथ, प्रांत, वंश या सर्वच ओळखीपुढे आम्ही केवळ भारतीय आहोत हा महान आदर्श ठेवला. विविधतेत जहर कालवणारी विषमता त्यांनी नाकारली. भारतीयांपुढे असे निखळ भारतमय भारताचे स्वप्न ठेवले. कवीला या उजेडाच्या दिशेच्या हाका ऐकायला येत आहेत आणि त्या हाकांच्या दिशेने कवी निघालेला आहे, असे मला वाटते. बाबासाहेबांनी भारतातील ऐंशी टक्के लोकांना म्हणजे स्त्रिया, ओबीसी, आदिवासी, भटके-विमुक्त, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध आणि इतर ही सर्व अधःपतितांना हे सांगितले की, माझ्या संविधानाने तुम्हाला तत्त्वतः देशाचे नायक करून ठेवले आहे. तुम्ही सर्व एकत्र या आणि निवडणुकीच्या मार्गाने देशाचे शासनकर्ते व्हा... पण हे सर्व लोक व्यवस्थेने चारलेल्या जाती धर्माच्या अफूने झिंगत आहेत. त्यामुळे आपल्यातल्या चौकटी सोडायला तयार होत नाहीत. ही माणसे अन्याय सहन करीत राहतात, पण एकत्र येऊन अन्यायमुक्त भारत निर्माण करीत नाहीत. कवीने याबद्दल खंत व्यक्त केली आहे. कवीने जखम या कवितेत आंबेडकरवादाची गरज बोलून दाखविली आहे. कोरोनाच्या महामारीचा संदर्भ देऊन इतिहासातील निरंतर लॉकडाऊनचा निर्देश कवीने केला आहे. माणसांना जातीमध्ये, पोटजातीमध्ये धर्मांमध्ये आणि अहंकारांध्ये बंद केले. हे लॉकडाऊन भारतात करणाऱ्या सांस्कृतिक कोरोनाचा निर्देश कवीने केलेला आहे. देवानंद पवार यांच्या कवितासंग्रहात असे कवीचे मन व्यक्त होते आणि ते माणसांना, माणसांच्या भल्यासाठी एकत्र गुंफणारेच आहे. ही जाती, धर्म यांनी दूषित झालेल्या आजच्या राजकारणाच्याऐवजी जाती, धर्मविहीन संविधानमय राजकारणाची प्रस्थापना करणारी कविता आहे. कवीला सदिच्छा ! सब्बे सत्था सुखी होन्तु !

**काव्यसंग्रह**
**- देवानंद पवार**
**- पृष्ठे : ८०**
**- मूल्य : १५० ₹**
**- बोधीपर्ण प्रकाशन, औरंगाबाद**
**- संवाद: ९१५८३५९६२८**

**- डॉ. यशवंत मनोहर**
**ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत, नागपूर**

# 'कुडपाण' ; माती, माणसं आणि स्मृतींचा अस्सल गावरान दस्तावेज..

ग्रामीण जीवनातील संघर्ष, मानवी नात्यांचे भावविश्व, सामाजिक वास्तव आणि कोकणच्या मातीतून उगवलेल्या अस्सल माणसांच्या कथा जेव्हा संवेदनशील लेखकाच्या लेखणीतून शब्दबद्ध होतात तेव्हा त्यातून 'कुडपाण'सारखा ताकदीचा कथासंग्रह जन्माला येतो. लेखक प्रकाश सकपाळ यांचा 'कुडपाण' हा कथासंग्रह वाचताना ग्रामीण आणि दलित जीवनाचे वास्तव साहित्याच्या केंद्रस्थानी आणणाऱ्या अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांच्यासारख्या साहित्यिकांनी समृद्ध केलेल्या परंपरेची प्रकर्षाने आठवण होते.या संग्रहाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील अस्सल कोकणी बोलीभाषा. लेखकाने कोकणातील लोकजीवन, त्यांच्या भावना, संघर्ष, संस्कार आणि जगण्यातील रांगडे सौंदर्य यांचे अत्यंत जिवंत चित्रण केले आहे. वाचकांच्या मनात उत्सुकता निर्माण करण्याचे आणि आशय सूचकपणे मांडण्याचे काम सायली कोंडकर यांनी आकर्षक मुखपृष्ठाव्दारे केले आहे. मुखपृष्ठावर निसर्गरम्य कोकणातील मोकळे आकाश, हिरवीगार धरती, उडणाऱ्या पक्षांचा थवा, मध्यभागी कमरेला पांढरे धोतर, खांद्यावर प्रचंड ढोल आणि हातात कुडपाण असलेला एक बलदंड, जोशपुर्ण ढोल वादक दिसतो. कुडपाणच्या कथा जशा मातीच्या गंधाने भरलेल्या आहेत, तशाच त्याचे मुखपृष्ठही कोकणच्या लोक जीवनाचा ढोल निनादवत वाचकांना त्या विश्वात घेऊन जातात. कथा वाचताना वाचक केवळ घटनांचा पाठपुरावा करत नाही, तर त्या जगण्याचा प्रत्यक्ष साक्षीदार बनतो.




'कुडपाण' ही कथा बाप लेकीच्या नात्यातील भावनिक पराकाष्ठेचे अप्रतिम चित्रण करणारी आहे. आस्मानाला छाताड दाखवत चोर डोंगर कैक पिढ्या दिमाखात उभा होता या सुरुवातीच्या वाक्यापासूनच कथा वाचकाला आपल्या कवेत घेते. निसर्गाचे वर्णन, पालखीचा सोहळा, धुपारतीचा सुगंध, ढोलांचा नाद आणि ग्रामीण वातावरणाची सजीव उभारणी कथेला दृश्यात्मक बनवते. बाळनाक महार आणि काशी ही पात्रे विशेष स्मरणात राहतात. काशीच्या माहेर प्रेमातून आणि बापावरील अपार प्रेमातून लेखकाने मानवी नात्यांची भावनिक खोली अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केली आहे. जातीव्यवस्थेचा विषय कुठेही घोषणात्मक न होता सहज कथानकातून समोर येतो, हे लेखकाचे मोठे यश म्हणावे लागेल.बाळनाक महार हे केवळ एक पात्र नाही तर, तो कोकणातील लोककलेचा जीवंत वारसा आहे. त्याचे आयुष्य संघर्षमय असले तरी, त्याची कला मात्र आभाळाएवढी उंच आहे. त्याच्यासाठी ढोल हे केवळ वाद्य नव्हते तर, तो त्याचा श्वास, अस्तित्व आणि ओळख होती. तो ढोल वाजवत नाही तर, निसर्गाशी संवाद साधत असतो. तो ढोल वादकच नाही तर, एक प्रेमळ बापही आहे. काशीच्या मनात त्याच्याबद्दल अपार आदर आणि प्रेम आहे. तिला त्याच्या ढोलाचा आवाज हजारो लोकांमधूनही ओळखता येतो. काशीचा आपल्या वडिलांवरील विश्वास म्हणजे बाळनाकाच्या आयुष्यभराच्या कर्तृत्वाचा सर्वोच्च सन्मान आहे. लेखकाने त्याची व्यक्तीरेखा विलक्षण प्रभावीपणे उभी केली आहे. तो उपेक्षित समाजातील कलावंत आणि आत्मगौरव जपणारा माणूस आहे. त्याच्या ढोलवादनाचे वर्णन अप्रतिम आहे.

दोन झाडे ही कथा एका गरीब, उपेक्षित वृध्द स्त्रीची जीवन कहाणी नसून, ती ग्रामीण समाज व्यवस्था, दारिद्र्य, मानवी संवेदना, अंधश्रद्धा, सामुदायिक जिव्हाळा आणि काळाच्या ओघात लोप पावत चाललेल्या जीवनमूल्यांचे प्रभावी चित्रण आहे. कथेची नायिका फुलीबाय ही महारवाड्यात राहणारी, आयुष्यभर दारिद्र्याशी झुंज देणारी स्त्री आहे. अंगात देवचार येतो, लोकांचे रोग बरे करते, पण स्वतःचे दुःख मात्र कुणाकडेही मांडत नाही. प्रकाश सकपाळ यांनी तिच्या व्यक्तीमत्वातील निरागसता, सहनशीलता आणि जीवनावरील प्रेम अत्यंत जीवंतपणे उभे केले आहे. तिचे वर्णन इतके प्रभावी आहे की, वाचकांच्या डोळ्यांसमोर फुलीबाय प्रत्यक्ष उभी राहते.'वचपा' ही कथा केवळ वैयक्तिक सूडाची कथा राहत नाही, तर ती ग्रामीण समाजातील सन्मान, सत्ता आणि सामूहिक स्वाभिमानाच्या संघर्षाचा दस्तावेज बनते. अपमानाचा वचपा काढण्याच्या भावनेतून उलगडणारी ही कथा एका संपूर्ण समाजमानसाचे दर्शन घडवते.'पंगेरा' ही कथा संग्रहातील सर्वाधिक आशयगर्भ कथांपैकी एक आहे. एका साध्या पंगेऱ्याच्या झाडाभोवती लेखकाने स्मृती, इतिहास, माती आणि माणूस यांचे नाते उलगडले आहे. विश्राम काजूंच्या आयुष्याशी जोडलेला पंगेरा हा केवळ वृक्ष राहत नाही; तो दलित समाजाच्या स्वाभिमानाचा आणि संघर्षाचा जिवंत साक्षीदार बनतो.'कोकांबीची पारध' ही कथा कोकणातील सामुदायिक लोक संस्कृती, परंपरा, अहंकार, मान सन्मान आणि गावगाड्याच्या मानसिकतेचे प्रभावी चित्रण करते. कथेमधील दृश्यात्मकता आणि रांगडी भाषा वाचकाला त्या वातावरणात घेऊन जाते. ही कथा केवळ शिकारीची गोष्ट नाही तर, ती एका काळाची, एका संस्कृतीची आणि एका जीवन पध्दतीची साक्ष देणारी जीवंत लोककथा वाटते.'मिसळ' ही कथा संघर्ष, यश आणि नियतीच्या क्रूर खेळाची हृदयस्पर्शी कहाणी आहे. अरुणभाई या पात्राच्या माध्यमातून लेखकाने एका सामान्य माणसाचा उत्कर्ष आणि त्यानंतरचे पतन अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे. येथे 'मिसळ' हा पदार्थ केवळ खाद्यसंस्कृतीचे प्रतीक राहत नाही, तर तो संघर्ष, यश आणि आठवणींचे रुपक बनतो.'येगळेचार' ही कथा समाजाच्या उपेक्षेला सामोरे जाणाऱ्या एका अपंग व्यक्तीच्या आत्मसन्मानाचा संघर्ष मांडते. ग्रामीण जीवनातील वास्तव आणि मानवी संवेदनांचा उत्कृष्ट संगम या कथेत दिसून येतो.'कांचन' ही कथा ग्रामीण दारिद्र्य, बालपण, स्त्रीजीवन आणि अपूर्ण स्वप्नांची अत्यंत वेधक नोंद आहे. कथानकाचा शेवट वाचकाच्या मनावर खोल परिणाम करुन जातो.'साव किलो पाखर' या कथेतून लेखकाने जितू या पात्राच्या माध्यमातून बालपणातील खोडकरपणा, मानवी स्वभावातील विसंगती आणि आयुष्याच्या शोकांतिकेचा प्रवास अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. 'कुंडलिक' ही संघर्ष, शिक्षण आणि मातृत्वाच्या त्यागाची प्रेरणादायी जीवनगाथा आहे. दारिद्र्य, उपासमार आणि शिक्षणासाठीचा लढा यांचे वास्तववादी चित्रण या कथेला विशेष उंची प्रदान करते.'सुशीला' ही कथा ग्रामीण शिक्षण व्यवस्थेचा इतिहास, स्त्रीच्या आयुष्यातील संघर्ष आणि शिक्षक व्यवसायातील निष्ठा यांचे हळवे चित्रण करते. शिक्षणामुळे गावात घडणारा सामाजिक बदल लेखकाने अत्यंत संयत आणि प्रभावी शैलीत मांडला आहे.एकूणच, 'कुडपाण' हा कथासंग्रह केवळ कथांचा संग्रह नाही; तो कोकणच्या मातीचा गंध, समाजजीवन, दलित अनुभवविश्व, मानवी नात्यांची ऊब, संघर्षाची धग आणि स्मृतींची ओल जपणारा एक महत्त्वपूर्ण साहित्यिक दस्तावेज आहे. प्रकाश सकपाळ यांनी आपल्या अस्सल बोलीभाषेच्या सामर्थ्यावर, सुक्ष्म निरिक्षण शक्तीवर आणि प्रभावी कथनशैलीवर आधारलेलं साहित्य निर्माण केले आहे. त्यांच्या कथा वाचकाला केवळ गुंतवून ठेवत नाहीत तर, अंतर्मुख करतात, विचार करायला भाग पाडतात, समाजाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देतात आणि माणुसकीवरचा विश्वास अधिक दृढ करतात.

वाचन मन समृध्द करते आणि लेखन त्या समृद्धीला शब्दरुप देते. मातीचा गंध जपणारे लेखक काळाच्या ओघात केवळ कथा लिहित नाहीत तर, इतिहासाची पाने जतन करत असतात. त्या अर्थाने प्रकाश सकपाळ यांचा कुडपाण हा कथासंग्रह समकालीन ग्रामीण मराठी साहित्यातील एक उल्लेखनीय आणि दीर्घकाळ स्मरणात राहणारा समृध्द साहित्यिक ठेवा ठरतो. कोकणच्या मातीचा गंध आणि माणूसकीची उब जपणाऱ्या या कथा मराठी साहित्य विश्वात निश्चितच आपले स्वतंत्र स्थान निर्माण करतील असा ठाम विश्वास वाटतो.



**कथा संग्रह : कुडपाण**
**लेखक : प्रकाश सकपाळ**
**प्रकाशन : स्पर्श प्रकाशन**
**किंमत : ₹ ३९०/-**
**मिलिंद कांबळे**
**चिंचवलकर-९८९२४८५३४९**

# आईचे स्वप्न साकार; बिभीषण गायकवाड यांनी ७० लाख रुपये खर्चून उभारली सुकळी येथील जिल्हा परिषद शाळा

## मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान यांच्या हस्ते लोकार्पण

**केज/प्रतिनिधी :** सामाजिक बांधिलकी जपत सुकळी ता. केज येथील बांधकाम व्यावसायिक बिभीषणराव गायकवाड (ह.मु.पुणे) यांनी आपल्या आईचे स्वप्न पूर्ण करत तब्बल ७० लाख रुपये स्वतः एकट्याने खर्च करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी पाच सुसज्ज आरसीसी वर्गखोल्या उभारल्या.

या नव्या शाळा इमारतीचे लोकार्पण बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान यांच्या हस्ते मंगळवारी दिनांक १७ जून२०२६ रोजी थाटातकरण्यात आले. एकेकाळी या शाळेची अवस्था अत्यंत दयनीय होती. वर्गखोल्या मोडकळीस आल्याने विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होत होता.



ही परिस्थिती बदलावी या उद्देशाने बिभीषणराव गायकवाड यांनी पुढाकार घेत शाळेची सुसज्ज इमारत उभारून दिली. शाळेत पाच वर्गखोल्यांसह संगणक, प्रोजेक्टर, सीसीटीव्ही कॅमेरे, स्वच्छतागृह, स्वयंपाकगृह, हॉल, खेळणी साहित्य, वृक्षारोपण, आकर्षक प्रवेशद्वार व पेव्हर ब्लॉकसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे गावातील विद्यार्थ्यांना दर्जेदार वातावरणात शिक्षण घेणे शक्य होणार आहे. यावेळी प्रशिक्षणार्थी शिक्षण अधिकारी मुळे, गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे, उपमुख्य वित्त व लेखा अधिकारी आबासाहेब घायाळ, जनकल्याण को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष उमेशराव कुलकर्णी, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रेय चाटे, केंद्रीय मुख्याध्यापक लक्ष्मणराव लाखे, बाबासाहेब साहू यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश गायकवाड तसेच गावातील युवक व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, सुकळी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विनायक आव्हाड हे लवकरच सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा जतीन रहमान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना जतीन रहमान म्हणाले, ‘‘बिभीषण गायकवाड यांनी स्वखर्चातून पाच सुसज्ज वर्गखोल्या उभारून शाळेला मोलाची मदत केली आहे. अशा उपक्रमांचे मी कौतुक करतो. समाजातील व्यावसायिक व्यक्तींनी शिक्षणासाठी मदत केल्यास शाळांची स्थिती बदलेल‘‘. यावेळी बिभीषणराव गायकवाड म्हणाले, ‘‘शाळेची अवस्था दयनीय झाली होती. गावातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी कुटुंबातील लेकरांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी शाळा उभारण्याचा निर्णय घेतला. समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा होती. आज आईने पाहिलेले स्वप्न पूर्ण झाल्याचा मोठा आनंद आहे.‘‘

# उबाठा पक्षात संवाद उरला नाही, त्यामुळे अनेक खासदार नाराज; चंद्रशेखर बावनकुळेंचा हल्लाबोल

**नागपूर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघच्या पोटनिवडणुकीच्या मतदानाला नागपुरात सुरूवात झाली आहे. भारतीय जनता पक्षासह मित्र पक्षांचे सर्व नगरसेवक अभ्यास दौरा आटोपून नागपूरच्या एका पंचतारांकित हॉटेलात दाखल दाखल झाले. त्यानंतर सर्व नगरसेवक एकाचवेळी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रवाना झाले. भाजपा नेते आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपा उमेदवाराच्या विजयाचा विश्वास व्यक्त केलाय. ते म्हणाले की, ’’विधान परिषद निवडणूक जाहीर झाल्याचेनंतर ६ उमेदवार बिनविरोध निवडून आलेत, तर ११ जागांवर भाजपा महायुतीचे उमेदवार ७५ टक्के मत घेऊन जिंकून येतील.’’

’विदर्भात काँग्रेसला वाली उरला नाही’ : ’’नागपुरात काँग्रेसला केवळ २० टक्के एवढी मतं मिळतील. भंडाऱ्यात काँग्रेसचा उमेदवार नाही, त्यामुळे विदर्भात महायुतीला फार मोठा विजय मिळणार आहे. अमरावतीत देखील काँग्रेसची परिस्थिती खराब आहे. तिथं काँग्रेसला कुणी वाली उरलेला नाही. भंडाऱ्यात तीच परिस्थिती आहे. चंद्रपूर यवतमाळचे उमेदवार सोडून गेले आहेत. काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष विदर्भातील आहेत, त्यांनी असं का होत आहे, याचा विचार करावा,’’ असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

उबाठा पक्षात संवाद उरला नाही : उद्धव ठाकरे यांच्या पक्षामध्ये असलेली खदखद बाहेर निघत आहे. आता उद्धव ठाकरेंनी विचार करायचा की हे का होत आहे. जर खासदारांना आपल्या मतदारसंघात काम करायचं असेल, तर सत्तेची गरज पडते आणि सत्तेशिवाय कुठलाच विकास होत नाही. जनतेनं आपल्याला निवडून दिलेलं आहे, विकासकामांचं काय होईल, अशी भीती खासदारांना वाटू लागलेली असेल. शेवटी जनतेच्या खासदार आणि आमदारांकडून फार अपेक्षा आहेत. उबाठा पक्षात खासदारांचे कोणी ऐकत नाही, संवाद नाही, तेव्हा हे जनप्रतिनिधी नाराज होणारच. संवाद होत नसल्याने कोणाला आमदार व खासदारांशी बोलायला वेळच नाही. याचा विचार नेतृत्वाने करायला पाहिजे, असे बावनकुळे म्हणाले.

संजय राऊतांनी भाषा सांभाळावी : ’’महाराष्ट्राच्या संस्कृतीचा पाढा वाचला तर असं करायला नको. संजय राऊतांनी असलं विधान करायला नको. स्वतःच्या पक्षातील आमदार व खासदारांवर पैसे घेतल्याचा आरोप करणं योग्य नाही. विकासाची भूमिका ही लोकप्रतिनिधींची असते. पैशाच्या भरोशावर कोणी पक्ष बदलेल असं मला वाटत नाही. उद्धव ठाकरे यांनी विचार करावा की जे उरलेले आमदार, खासदार आहेत, त्यांना कसं सांभाळावं. उद्धव ठाकरे यांनी विचार केला नाही, तर जे आमदार आणि खासदारांना योग्य वाटेल ते करतील,’’ असंही त्यांनी यावेळी सांगितली.

पैशासाठी कुणी इकडे तिकडे जाणार नाहीत : ’’उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडं कमी पैसे नाहीत, पैशाने कोणाला थांबवता येत असेल, तर थांबवा आणि पैशासाठी कोणी जात नाही. महाराष्ट्रात सर्व पक्षाच्या आमदार आणि खासदारांवर मला विश्वास आहे, पैशानं कोणी कुठं जात नाही. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी आता विचार करायला पाहिजे. आरोप- प्रत्यारोप करून काय होणार आहे. बुथवर काम करणारे आमचे दोन कार्यकर्ते जरी सोडून गेलेत, तरी आम्ही विचार करतो की आमचं काय चुकलं, उद्धव आणि आदित्यनं याचा विचार करावा,’’ असंही चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

काँग्रेस विरोधात खासदारांच्या मनात असंतोष : ’’महिला आरक्षण दुरुस्ती विधेयकाच्या संदर्भात काँग्रेस पक्षानं जी भूमिका घेतली होती, त्यानंतर त्याचाही राग अनेक खासदारांच्या मनात आहे. खासदारांच्या मनात असंतोष खदखदत आहे. आम्ही कोणाचे आमदार, खासदारांशी बोलत नाही. आम्ही कोणाशी चर्चाही सुद्धा करत नाही. आमच्याकडे संख्या आहे, कार्यकर्ते सुद्धा आहेत,’’ असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# मध्यरात्री चार्टर्ड विमानाने ६ खासदारांनी दिल्ली गाठली, काँग्रेसमध्ये विलीनीकरणाची भीती

**मुंबई/प्रतिनिधी :** उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना अखेर फुटली. दिल्लीत मध्यरात्री दाखल झालेले विमान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेली गुप्त बेठक आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांना बंडखोर खासदारांनी दिलेले पत्र, या सगळ्या घटना अत्यंत गुप्तपणे आणि उघड वाच्यता होणार नाही याची काळजी घेत पार पडल्या. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शिवसेना उबाठा गटातील दुसऱ्या फुटीच्या हालचालींना १६ जून मध्यरात्रीपासूनच सुरुवात झाली. उबाठा गटाने व्हीप बजावलेल्या बैठकीला नऊ पैकी केवळ तीनच खासदार उपस्थित राहिल्याने आता या फुटीवर जवळपास शिक्कमोर्तब झाला आहे.

शिवसेना उबाठा गटाने १४ जून रोजी बोलवलेल्या बैठकीला बंडखोर खासदारांनी दांडी मारली होती. त्यापूर्वी त्यांनी आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसाला देखील उपस्थित राहण्याचे टाळले होते. यात यवतमाळचे खासदार संजय देशमुख, परभणीचे खासदार संजय जाधव, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, उत्तर-पूर्व मुंबईचे खासदार संजय दीना पाटील यांनी आता वेगळा गट स्थापन करुन शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. शिंदेसेनेकडून यासाठी गेल्या काही दिवसांपासून ’’ऑपरेशन टायगर’’ राबवले जात असल्याचे सांगितले जाते.

# कापूस उत्पादन अभियानांतर्गत मोफत कापूस बियाण्यांचे वाटप



**केज/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या ‘कापूस उत्पादकता अभियान (कापूस क्रांती)’ अंतर्गत केज तालुक्यातील कळंबआंबा येथे लॉटरी पद्धतीने निवड झालेल्या कृषी विभागाच्या आत्मा अंतर्गत स्थापन शेतकरी गटांना मोफत कापूस बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

राज्यात कापसाचे उत्पादन व गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत असून, आधुनिक पद्धतीने कापूस लागवडीसाठी शेतकऱ्यांना १०० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे.

या अभियानांतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात कापूस पीक प्रात्यक्षिके करण्यासाठीही संपूर्ण अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. योजनेविषयी सविस्तर मार्गदर्शन करताना मंडळ कृषी अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी सांगितले की, जमिनीच्या प्रकारानुसार कापूस लागवडीच्या तीन आधुनिक पद्धतींना या अभियानात प्रोत्साहन दिले जात आहे.

कापूस लागवडीच्या पद्धती सघन कापूस लागवड (एचडीपीएस पद्धत) उथळ व हलक्या जमिनीसाठी ही पद्धत उपयुक्त असून, ९० १५ सेंटीमीटर अंतरावर लागवड केली जाते.

जवळचे अंतर लागवड (सीआयओएसई एसपीएसीआयएनजी) मध्यम प्रकारच्या जमिनीसाठी ९० ३० सेंटीमीटर अंतरावर लागवड करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

एकात्मिक पीक व्यवस्थापन (आयसीएम) चांगल्या व सुपीक जमिनीसाठी ९० ६० सेंटीमीटर अंतरावर लागवड केली जाते. या योजनेअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला किमान ०.४० हेक्टर ते कमाल २ हेक्टर क्षेत्रासाठी लाभ देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी प्रशांत वाघमारे, आत्माचे योगेश पाटील, सहाय्यक कृषी अधिकारी ज्ञानेश्वर इंगळे, सरपंच शशिकांत इंगळे, उपसरपंच नितीन वाघमारे तसेच शेतकरी गटाचे सदस्य कांताराव इंगळे, अश्विन टोंपे, गणेश शिंदे, विष्णू टोंपे, राजाभाऊ पांचाळ, काका जाधव आदी उपस्थित होते.

# उमरी येथील विशाल डेअरीवर छापा, ६.६८ लाखाचा मुद्देमाल जप्त





**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील उमरी शिवारात चालणाऱ्या विशाल डेअरी व खवा निर्मिती कारखाण्यावर वर एफडीएच्या पथकाने बुधवारी रात्रीच्या वेळी अचानक छापा टाकून ६ लाख ६८ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

एफडीए पथकाने छापा टाकल्यानंतर त्यांना कारखाना परिसरात कीटक आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसून आले

या डेअरीमध्ये मोठ्या प्रमाणावर अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन होत असल्याची माहिती अन्न व औषधी प्रशासनाला मिळाली होती. या पार्श्वभूमीवर एफडीएच्या पथकाने हा छापा रात्रीच्या वेळी अचानक टाकला होता. या छाप्यात अधिकाऱ्यांना डेअरीच्या आत प्रचंड घाण, कचरा आणि कीटक (कीडे) आढळून आले. अत्यंत अस्वच्छ वातावरणात ग्राहकांच्या आरोग्याशी खेळत तिथे दुधा पासून खवा, पेढे व दुधापासून इतरही कांही डेअरी प्रॉडक्ट्स तयार केले जात असल्याची माहिती मिळाली.विशाल डेअरी आणि खवा निर्मिती केंद्रातून कारवाईदरम्यान लिक्विड ग्लुकोज, खुला खोवा, वनस्पती तूप (सूर्या गोल्ड), प्रीमियम गोल्ड हलवा (व्हाईट), प्रीमियम गोल्ड हलवा (ब्राऊन) आणि इंडियन स्वीट ट्रेडिशनल फूड स्वीट हे पदार्थ तेथे आढळून आले.या पदार्थांचे नमुने गुरूवारी तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहे.

या कारवाई दरम्यान अधिकाऱ्यांनी ६ लाख ६८ हजार रुपयांचे बनावट आणि असुरक्षित अन्नपदार्थ जप्त केले आहेत. तसेच, तपासणी वेळी उत्पादनाच्या नोंदी आणि बिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आढळून आली. डेअरीमधील अमानवीय घाण आणि कायदेशीर त्रुटींमुळे प्रशासनाने या डेअरीचा परवाना तात्काळ रद्द केला.

आपल्याच बीड जिल्ह्यावर कडक नजर ठेवणारे तुकाराम मुंढे हे मूळचे बीड जिल्ह्यातील रहिवासी आहेत. त्यांनी संपूर्ण राज्यात जी कडक शिस्त लावली आहे, तीच शिस्त आणि नागरिकांच्या आरोग्याची काळजी आता ते स्वतःच्या जिल्ह्यातही घेत आहेत. मुंढे साहेब आता बीड जिल्ह्यावरही बारीक लक्ष देत आहे, त्यांच्या या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

## नवीन बजाज पल्सर २२०एफ एलईडी हेडलाइटसह लाँच, किंमत १.३६ लाख

**मुंबई/प्रतिनिधी :** बजाज ऑटोनं आपल्या लोकप्रिय पल्सर २२०एफ मॉडेलला महत्त्वपूर्ण अपडेट दिले आहे. आता या बाइकला आकर्षक एलईडी हेडलाइट मिळाले आहे. ही अपडेट ग्राहकांच्या दीर्घकाळाच्या मागणीवर आधारित आहे. डिसेंबर २०२५ मध्ये एलईडी इंडिकेटर्स आणि नवीन ग्राफिक्स मिळाल्यानंतर ही दुसरी महत्त्वाची सुधारणा आहे.पल्सर २२०एफ अपडेट: बजाज पल्सर २०२० एफ (झ्रीश्रीरी २२०इ ) च्या नवीन व्हर्जनमध्ये सर्वात मोठा बदल म्हणजे एलईडी हेडलाइट युनिट आणि त्यात एकात्मिक एलईडी डे-टाइम रनिंग लाइट्स (ऋळडी). पूर्वीच्या हॅलोजन हेडलाइटऐवजी ही आधुनिक एलईडी लाइटिंग आली आहे. बाइकचे सेमी-फेअर्ड फ्रंट एंड आणि एकूण डिझाइन मात्र जुन्याप्रमाणेच ठेवले आहे. वर्षानुवर्षे ओळखला जाणारा पल्सर २२०एफ चा सिल्हूट यात कायम आहे.

# केज शहरातील शाळा, महाविद्यालय व खाजगी क्लासेस परिसरात टवाळखोरांचा वावर वाढला

## सहा.पो.अधीक्षक पंकज कुमावत आणि पो.नि. शंकर वाघमोडे यांची उणीव भासु लागली!

## केज पोलिसांनी या परिसरात गस्त वाढवण्याची गरज-पालकांची मागणी

**केज/प्रतिनिधी :** केजशहरातीलशाळा, महाविद्यालय व खाजगी क्लासेस परिसरातील टवाळखोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी पालकांतुन केली जात आहे. तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे यांची उणीव ही शहरातील नागरिकांना व पालकांना भासत आहे.

अशा प्रतिक्रिया पालक वर्गातून ऐकण्यास मिळत आहेत. केज शहरातून व बस स्थानकातून मोटरसायकलची चोरी, महिला प्रवाशांचे सोन्याचे दागिने, पर्स चोरी, अवैद्य धंदे, प्रवासी वाहतूक, मुलींची छेडछाड करणाऱ्या टवळखोरांना लगाम लावण्यासाठी केज शहराला खमक्या अधिकारीची गरज आहे. असे जनसामान्यातून बोलले जात आहे.

केज शहरातील खाजगी क्लासेस व शाळा आणि महाविद्यालय परिसरात टवळखोरांचा वावर वाढला असून या




ठिकाणी पोलिसांची गस्त वाढविण्याची गरज आहे. जेणेकरून वाईट घटनेला आळा बसेल. केज शहरातील गल्लीबोळात व शाळा महाविद्यालय परिसरामध्ये सर्रासपणे अवैद्य हातभट्टी व देशी दारूची विक्री केली जात आहे. यामुळे विद्यार्थी-युवक हा व्यसनाधीन होत आहे. या दारू विक्री करणाऱ्यांना नेमके अभय कोणाचे आहे. या दारूमुळे अनेक तरुणांना जीव गमवावा लागला आहे.

तर अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. परंतु सर्रासपणे केज शहरासह धाब्यावर देशी दारूची विक्री सुरू आहे. केज शहरातील शाळा व महाविद्यालय आणि खाजगी ट्युशन या परिसरामध्ये टवळखोराकडून मुलीची छेडछाड केली जात आहे.नुकत्याच शाळा महाविद्यालये सुरू झाल्या आहेत.या ठिकाणी टवाळखोर राजरोसपणे हुल्लडबाजी करताना दिसुन येत असून अशा टवळखोरामुळे मुली व त्यांचे पालक वर्गामध्ये भितीचे वातावरण पहावयास मिळत आहे. अनेक पालकांनी आपल्या मुलींना शाळेतून व महाविद्यालयात शिक्षण घेण्यापासून वंचित ठेवल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सध्या मुलींच्या सुरक्षेतेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असुन टवळखोराकडून मुलीची छेडछाड करण्यात येत असल्याने या भीतीपोटी पालक या टवळखोरांच्या विरोधात तक्रार देण्यास धजावत नाहीत. कारण की, जर एखाद्या पालकाने तक्रार केली तर मुलीचे नाव उघडकीस येऊन मुलीची व पालकांची इज्जत चव्हाट्यावर येऊ नये या भीतीपोटी पालक हे टवळकोरांच्या दहशतीखाली आहेत.

तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे यांच्या कार्यकाळामध्ये यांनी अशा टवाळखोरांना चांगलाच धडा शिकविला होता. त्यांच्या कार्यकाळात महिला व मुली सुरक्षित होत्या. अशा प्रतिक्रिया नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहेत. केज पोलिस यावर काय निर्णय घेतात.हे पहाणे औचित्याचे ठरणार आहे.

## हरंगुळ खुर्द येथे जागतिक बालमजुरी विरोधी दिन आणि मोफत शिक्षण हक्क कायद्याविषयी मार्गदर्शन



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर जिल्हा परिषदेचा प्राथमिक शिक्षण विभाग आणि जिल्हा परिषद प्रशाला हरंगुळ खुर्द यांच्या संयुक्त विद्यमाने हरंगुळ खुर्द येथील जिल्हा परिषद प्रशालेत जागतिक बालमजुरी विरोधी दिन व मुलांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा या विषयांवर कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर आणि शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, लातूरचे गटशिक्षण अधिकारी चांद शेख, समग्र शिक्षा अभियान प्रमुख सतिष भापकर, शाळेच्या मुख्याध्यापिका राजकन्या गंभीरे, हरंगुळ खुर्दचे सरपंच मनोहर झुंजे पाटील आणि उपमुख्य न्यायरक्षक ॲड. जी.जे. मिटकरी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. गिरवलकर यांनी भारतीय राज्यघटनेतील कलम २१अ नुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असून या वयोगटातील मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवता येणार नाही, असे स्पष्ट केले. तसेच, घटनेतील कलम २३ हे शोषणाविरुद्धच्या हक्काशी संबंधित असून ते माणसांचा व्यापार करण्यास किंवा कोणत्याही व्यक्तीला तिच्या इच्छेविरुद्ध सक्तीने काम करण्यास भाग पाडण्यास प्रतिबंध करते, अशी माहिती त्यांनी दिली.

भारतात बालमजुरी रोखण्यासाठी असलेल्या बाल कामगार प्रतिबंध कायदा १९८६ अंतर्गत १४ वर्षांखालील मुलांना कामावर ठेवण्यास सक्त मनाई असून या कायद्याचे उल्लंघन केल्यास संबंधितास कायदेशीर शिक्षा व दंडाची तरतूद असल्याचेही श्री. गिरवलकर यांनी सांगितले. कुठेही बालमजुरी होताना आढळून आल्यास नागरिकांनी तात्काळ स्थानिक पोलीस स्टेशन किंवा चाइल्ड लाईनच्या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शाळेतील एकूण १०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

## शिवसेना (उबाठा) पक्षातील बंडखोर सहा खासदारांना वाय+ सुरक्षा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता विभागाने राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि संबंधित यंत्रणांना तातडीचा वायरलेस संदेश पाठवून बंडखोर खासदारांना वाढीव सुरक्षा पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. सुरक्षा देण्यात आलेल्या खासदारांमध्ये संजय देशमुख (यवतमाळ), संजय जाधव (परभणी), संजय दिना पाटील (मुंबई उत्तर-पूर्व), नागेश पाटील आष्टीकर (हिंगोली), ओमराजे निंबाळकर (धाराशिव) आणि भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी) यांचा समावेश आहे.

गुप्तवार्ता विभागाच्या निर्देशानुसार, संबंधित पोलीस यंत्रणांनी स्थानिक परिस्थिती आणि संभाव्य धोक्याचे मूल्यांकन करून या खासदारांच्या दौऱ्यांदरम्यान आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात. तसंच पुढील जिल्हा किंवा आयुक्तालय स्तरावरील सुरक्षा समितीच्या बैठकीत त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन ती कायम ठेवणे, वाढवणे किंवा कमी करण्याबाबत निर्णय घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

दरम्यान, यापूर्वीच शिवसेना (उबाठा) नेते आणि खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत बंडखोरीच्या चर्चावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली होती. ''आमचा पक्ष पुन्हा फोडण्याचा प्रयत्न झाला तर आम्ही गप्प बसणार नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसैनिकांना हे मान्य होणार नाही,'' असा इशारा त्यांनी दिला होता. तसंच पक्षाशी बेईमानी करणाऱ्यांना ''धडा शिकवू'' असे वक्तव्यही त्यांनी केले होते.

राऊत यांनी, ''आता एकनाथ शिंदे त्यांना बॉडीगार्ड देतील, मागे-पुढे गाड्या देतील आणि जणू काही युद्ध जिंकून आल्यासारखे ते फिरतील,'' अशी टीकाही केली होती. विशेष म्हणजे, या वक्तव्यानंतर काही तासांतच संबंधित सहा खासदारांना Y+ सुरक्षा मंजूर झाल्याची माहिती समोर आल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे.

Y+ सुरक्षा म्हणजे काय?

Y+ सुरक्षा श्रेणीत साधारणपणे सशस्त्र सुरक्षा कर्मचारी, वैयक्तिक सुरक्षा अधिकारी आणि २४ तास सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून दिली जाते. संबंधित व्यक्तीला असलेल्या धोक्याच्या आकलनानुसार सुरक्षा यंत्रणा तैनात केली जाते.

## खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या निवासस्थानी कडेकोट पोलीस बंदोबस्त, अनुचित प्रकार घडू नये यासाठी विशेष खबरदारी

**शिर्डी/प्रतिनिधी :** खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिवसेना ठाकरे पक्ष सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर शिर्डी लोकसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. वाकचौरे यांच्या या निर्णयानंतर ठाकरे शिवसेनेतील कार्यकर्ते आणि शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून विविध ठिकाणी आंदोलनाच्या हालचाली सुरू झाल्याचं चित्र आहे. या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसंच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. खासदार वाकचौरे यांच्या शिर्डीतील निवासस्थानासह संपर्क कार्यालयाबाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक गोपालकृष्णन यांच्यासमवेत महत्वपूर्ण बैठक

# लातूर लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण रेल्वे विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणार : खा. डॉ. शिवाजीराव काळगे

**उदगीर/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक गोपालकृष्णन यांच्या दौऱ्यादरम्यान लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी त्यांची भेट घेऊन मतदारसंघातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी रेल्वे विकास, प्रवासी सुविधा, नवीन रेल्वेमार्ग, सुरक्षा व्यवस्था आणि गाड्यांच्या विस्तारासंदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन विभागीय व्यवस्थापकांना सादर करण्यात आले. लातूर लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण रेल्वे विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असाल्याचे : खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी यावेळी सांगितले.




खा. डॉ. काळगे यांनी सिकंदराबाद - मुंबई आणि सिकंदराबाद - पुणे या मार्गांवर विकाराबाद - जहीराबाद - बिदर - लातूर रोड - लातूर - कुर्डुवाडी मार्गे वंदे भारत शयनयान सेवा सुरू करण्याची मागणी केली. तसेच प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता काझीपेठ - हडपसर - काझीपेठ एक्सप्रेस आणि यशवंतपूर - लातूर एक्सप्रेस या आठवड्यातून तीन दिवस धावणाऱ्या गाड्या नियमित चालविण्याची मागणीही करण्यात आली .

बोधन - लातूर रोड नवीन रेल्वेमार्ग, लातूर रोड - नांदेड नवीन मार्ग आणि विकाराबाद - परळी वैजनाथ दुहेरीकरण या प्रस्तावित प्रकल्पांच्या सर्वेक्षणाची सद्यस्थिती जाहीर करून कामांना गती देण्याची मागणी करण्यात आली. उदगीर व लातूर रोड रेल्वे स्थानकांवर कायमस्वरूपी रेल्वे संरक्षण दलाची () चौकी स्थापन करण्याची आवश्यकता खासदारांनी अधोरेखित केली.

याशिवाय मछलीपट्टणमबिदर एक्सप्रेसचा लातूरपर्यंत विस्तार, बिदर - लातूर दरम्यान दिवसातून दोन वेळा सेवा सुरू करणे, कोविड काळात बंद झालेल्या लोकमान्य टिळक टर्मिनस - बिदर आणि कोल्हापूर - बिदर या गाड्या पुन्हा सुरू करणे, सिकंदराबाद - शिर्डी एक्सप्रेसची वारंवारता वाढविणे आणि हैदराबादबिदर इंटरसिटी एक्सप्रेसचा लातूरपर्यंत विस्तार करणे या मागण्याही मांडण्यात आल्या. कोविडपूर्वीचे विविध रेल्वे स्थानकांवरील (कारेपूर, जानवळ, हेर, रोहिणा ) थांबे पूर्ववत करणे, पानगाव येथे नांदेड पनवेल एक्सप्रेस साठी अतिरिक्त थांबे मंजूर करणे, सीएसएमटीबिदर एक्सप्रेसला अतिरिक्त डबे जोडणे, खानापूर जंक्शनपरळी वैजनाथ विभाग नांदेड विभागाकडे हस्तांतरित करणे तसेच मराठी भाषा कक्ष स्थापन करणे या मागण्यांचाही समावेश निवेदनात करण्यात आला.

खानापूर जंक्शन येथील विद्यमान पिट लाईनचा उपयोग करून बिदरहून पुणे, मुंबई व अहमदाबादकडे नियमित रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच हेर, वडवळ नागनाथ आणि पानगाव येथील रेल्वे फाटकांवर उड्डाणपूल उभारणे, प्रवासी सुविधा अधिक सक्षम करणे, लातूर रोड स्थानकावरील फलाट क्रमांक २ व ३ वर संरक्षित शेड उभारणे, पानगाव येथील मालधक्का सुविधा पूर्ववत सुरू करणे आणि जानवळ परिसरातील रोड अंडर ब्रिजच्या दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

यावेळी उदगीर रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष रमेश अंबरखाने, सचिव मोतीलाल डोईजोडे, माजी आमदारशिवराज तोंडचिरकर, उमाकांत वडजे, विजय पारसेवार, नाथा कोटलवार, आशिष पाटील, दयानंद बिरादार, एस. एस. पाटील, मुरलीधर जाधव, विश्वनाथ बिरादार, ओम गांजुरे, श्रीनिवास सोनी, सचिन शिवशेट्टे यांच्यासह मराठवाडा जनता विकास परिषदेचे सदस्य, विविध संस्था व संघटनांचे पदाधिकारी, दक्षिण मध्य रेल्वेचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दयानंदच्या एन.सी.सी. कॅडेट्स जिजाऊ डिगोळे हीचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयाची प्रथम वर्षाची एन.सी.सी. कॅडेट्स जिजाऊ विठ्ठल डिगोळे या विद्यार्थीनीची मुंबई पोलीस दलामध्ये निवड झाली आहे. त्या निवडी बद्दल दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

जिजाऊ विठ्ठल डिगोळे ही दयानंद सायंन्स कॉलेज मध्ये प्रथम वर्षात शिकत असताना, मुंबई पोलीस साठी प्रयत्न करताना सुरुवातीला ग्राउंडची तयारी ७-८ महिने केल्यानंतर मुंबई येथे ग्राउंड टेस्ट झाली. त्यात रनिंग, गोळाफेक होते. रनिंगच्या दोन इव्हेंट त्यात १०० मीटर व ८०० मीटर असून ग्राउंडमध्ये ५० पैकी ४३ मार्क्स आले. व लेखी परीक्षा दि. १२-४-२०२६ तारखेला झाली त्यात १०० पैकी ८३ मार्क्स आले. त्या परीक्षेचे मेरिट दि. २७-४-२०२६ ला लागले असून त्यात एकूण १२६ मार्क्स घेऊन तीचे मध्ये सिलेक्शन मुंबई पोलीसला झाले. ती सुरुवातीपासून दयानंद कॉलेज मध्ये घेतल्या नंतर कॉलेजचा अभ्यास व ग्राउंडची तयारी सोबत केली. ग्राउंडसाठी सकाळी ५ वाजता उठून साठी जायचे ५ ते ७:३० ग्राउंड व त्यानंतर कॉलेज केले या सोबतच पोलीस भरती अभ्यास व त्यानंतर कॉलेजमध्ये ४ ते ६ परेड व त्यानंतर सायंकाळी ६ ते ८ सेल्फ स्टडी व त्यानंतर घरी ९ ते १२ कॉलेजचा अभ्यास केला. सुरुवातीपासून अभ्यासात सातत्य, मेहनत, जिद्द, चिकाटी व स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द यामुळे हे यश संपादन झाले.

डिपार्टमेंटचे हेड चौधरी सर यांनी मला योग्य मार्गदर्शन केले दयानंद महाविद्यालयातून पहिल्याच वर्षी यश संपादन झाले. एन.सी.सी. द्वारे भारताच्या राष्ट्रनिर्मितीत योगदान देते. विविध जाती, पंथ आणि संस्कृतींच्या लोकांमध्ये परस्पर संवाद घडवून आणून राष्ट्रीय एकात्मता साधण्यात एन.सी.सी. शिबिरे महत्त्वाची भूमिका बजावतात. राष्ट्र आणि समाजाच्या सेवेत योगदान देण्याच्या, तरुणांना भविष्यासाठी लष्करी प्रशिक्षण देण्याच्या आणि त्यांना सकारात्मक दिशेने वाटचाल करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, दयानंद सायन्स कॉलेजने १९७१ मध्ये नॅशनल कॅडेट कोर्प्स विभाग सुरू केला. आमच्या महाविद्यालयाचे एन.सी. सी. युनिट अत्यंत सक्रिय आणि उत्साही आहे. कॅडेट्सनी अनेक शिबिरांमध्ये सहभाग घेतला आहे आणि युनिट स्तरावर विविध उपक्रम आयोजित करण्यात पुढाकार घेतला आहे.

याव्यतिरिक्त, बटालियनद्वारे आयोजित एन.सी. सी. कॅम्प व विविध उपक्रमांमध्येही जसे की एन.सी.सी. दिन साजरा करणे, पल्स पोलिओ मोहीम, रक्तदान शिबिर, एड्स जनजागृती मोहीम आणि गणेशोत्सव साजरा करणे यासाठी कॅडेट्सना प्रोत्साहीत केले जाते. यावर्षी दयानंद विज्ञान महाविद्यालयाने यशाची उज्वल परंपरा कायम राखत नुकत्याच जाहीर झालेल्या पोलीस भरती प्रक्रीयेत आमच्या महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट्स जिजाऊ विठ्ठल डिगोळे हीची निवड झालेली आहे.

तीच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी त्याचे अभिनंदन केले.तसेच महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते जिजाऊ विठ्ठल डिगोळे, तीचे वडील डिगोळे विठ्ठल विनायक व आई सविता विठ्ठल डिगोळे यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ. जे. एस. अनगुलवार, प्रा. एस. बी. गावित, प्रा. एस. डी. पाटील, प्रा. गायकवाड, प्रा. एम. एस. गलावे, प्रा.प्रतिभा सोनवने, प्रा. एन. आर. चिवडशेट्टी, यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन

## पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी घेतला आढावा




**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार आहे. लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जिल्हास्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज आढावा घेतला. यानिमित्ताने जिल्ह्यात विविध ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर यांच्यासह योग विषयक विविध संस्थांचे पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची अधिकृत संकल्पना 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' अशी निश्चित करण्यात आली आहे. या दिनाचे औचित्य साधून लातूर जिल्ह्यात २१ जून २०२६ रोजी सकाळी ७ ते सकाळी ७:४५ या वेळेत सामूहिक योग अभ्यासाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी यावेळी केले. जिल्हास्तरीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या संबंधित यंत्रणांनी काळजीपूर्वक पार पाडण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# लातूरच्या औद्योगिक विकासासाठी अत्याधुनिक विमानतळाची निर्मिती करावी – माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर

**लातूर/प्रतिनिधी :** औसा मतदार संघाचे कर्मयोगी आमदार अभिमन्यू पवार यांच्या व माझ्या शुभहस्ते हॉटेल मालवणी किचनचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. ही लातूरकरांच्या दृष्टिने आनंदाची बाब आहे. १९९५ मध्ये मी आमदार असताना रविंद्र कांबळे हे कॉन्ट्रक्टरशिप करीत होते परंतु त्यांना त्यामध्ये म्हणावे तसे यश मिळाले नाही. त्यानंतर त्यांनी हॉटेल व्यवसायामध्ये पदार्पन केले. महाराष्ट्र नागरी बँकेकडून घेतलेल्या अल्पशा कर्जावर त्यांनी हॉटेल व्यवसायात यशस्वी भरारी मारलेली आहे. आज ते आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले असून हॉटेलच्या तिसऱ्या शाख-ेचा शुभारंभ आज झालेला आहे. त्यांची ग्राहकांशी बोलण्याची लिनता, लोकांचा संपर्क आणि व्यावसायातील गुणवत्ता या आधारावर या व्यवसायामध्ये यशस्वी भरारी मारलेली आहे. लातूर शहरामध्ये औद्योगिकदृष्ट्या अनेक सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे लातूरच्या औद्योगिक विकासासाठी अत्याधुनिक विमानतळाची निर्मिती करावी, असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते लातूर शहरातील खाडगाव रिंग रोड परिसरामध्ये प्रो.प्रा.रविंद्र कांबळे यांच्या संकल्पनेतून हॉटेल अजिंठा नंतर हॉटेल मालवणी किचन अँड फॅमिली रेस्टॉरंटचा शुभारंभ प्रसंगी बोलत होते.

यावेळी या कार्यक्रमाला औसा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार, भाजपाचे विरोधी पक्षनेते देविदास काळे, पुणे येथील उद्योजक सुनिल गायकवाड, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस संजय शेटे, भाजपा नगरसेवक गोटू यादव, पिंटू साळुंके, योगेश स्वामी, एमएनएस बँकेचे मा.संचालक सूर्यकांतराव शेळके, एस.आर.मोरे, रविंद्र कांबळे, एमएनएस बँकेचे प्र.कार्यकारी संचालक नितीन सराफ, प्रविण जाधव, कवी नरसिंग इंगळे, बुध्दभूषण कांबळे, शुध्दोदन कांबळे, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, देशामध्ये १९९१ मध्ये मुक्त अर्थव्यवस्था सुरू झाली आणि जगातील अनेक व्यवसाय भारतामध्ये आले. त्यावेळी भारतातील जीडीपी ची तूट १५ टक्के होती. ती आज दीड टक्क्यावर आलेली आहे. देशाचे पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली भारताचा चौफेर विकास चालू आहे. त्यामुळे अमेरिका व चीनलाही मागे टाकून २०४७ मध्ये भारत महासत्ता बनून जगाचे नेतृत्व करेल, असा विश्वासही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांचा सत्कार हॉटेल मालवणी किचनचे संचालक रविंद्र कांबळे, राजेभाऊ मुळे, उध्दवराव जाधव, बाबासाहेब देशमुख, बुध्दभूषण कांबळे, डॉ.शुध्दोदन कांबळे आदींनी केला. तसेच हॉटेलचे संचालक रविंद्र कांबळे यांचा सत्कार प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमाला माजी नगरसेवक बालाजी शेळके, शिवराम कदम, प्रतापराव शिंदे, भरत जाजू शेठ, कमलाकर कदम, गोविंद कदम, रोहन कदम, बी.टी.कदम, सुभाषअप्पा सुलगुडले, लाला पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

हॉटेल कामतप्रमाणे रविंद्र कांबळे यांचे हॉटेल मालवणी किचन उद्योग क्षेत्रात यशस्वी व्हावे

– आ.अभिमन्यू पवार



हॉटेल व्यवसायातील उद्योजक रविंद्र कांबळे कव्हेकर भाऊंच्या मदतीने हॉटेल व्यवसायात पदार्पण केले. चांगल्या व्यक्तींच्या सहवासात राहून त्यांनीही वाटचाल सुरू केलेली आहे. त्यात ते यशस्वी झाले. हॉटेल व्यावसायातील तिसऱ्या शाखेचा शुभारंभ आज त्यांनी केलेला आहे. या उद्योगामध्ये काम करताना रविंद्र कांबळे यांनी साहेबांच्या अंगी असलेला चिवटपणा आत्मसात करून हॉटेल व्यवसायामध्ये भरारी मारलेली आहे. या पुढील कालावधीत त्यांनी औसा शहरामध्ये ही हॉटेल व्यवसाय सुरू करावा. यासाठी मोफत जागा देण्याचे काम आपण करू त्यांनी उद्योग क्षेत्रात हॉटेल कामत प्रमाणे भरारी घेऊन हॉटेल व्यवसायात नावलौकिक वाढवावा. असे आवाहन औसा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.